# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण कार्यालय नवीन ईमारत
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
संकेतस्थळ : https://mmrda.maharashtra.gov.in दूरध्वनी क्र. : ०२२-२६५९ ४१९७.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील 'सहायक विधी सल्लागार' व 'लघु-टंकलेखक' या संवर्गातील रिक्त पदे सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत सरळसेवेने कायमस्वरुपी भरण्याबाबत जाहिरात.

| पदाचे नाव व वेतनश्रेणी | पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वय | पदसंख्या | एकूण |
|---|---|---|---|
| **सहायक विधी सल्लागार**<br>(पी.बी.-III<br>रु.१५६००-३९१००<br>+ ग्रे.वे.रु.६६००/-) | (i) **शैक्षणिक अर्हता** : उमेदवार विधी शाखेची पदवी अथवा युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठाची समकक्ष अर्हता धारक असावा.<br>(ii) **वय** : खुला प्रवर्गाकरिता ३८ वर्षे कमाल वयोमर्यादा. (प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना वयाचे बंधन नाही)<br>(iii) **अनुभव** : उच्च न्यायालय किंवा शहर दिवाणी न्यायालय किंवा दुय्यम न्यायालय येथील ७ वर्षापेक्षा कमी नाही इतका प्रत्यक्ष वकिली म्हणून अनुभव धारक असावा.<br>**किंवा**<br>शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/ महामंडळे यापैकी कोणत्याही कार्यालयात जबाबदारीच्या पदावर ७ वर्षापेक्षा कमी नाही इतका कामाचा अनुभव.<br>उमेदवारास मसूदा, एम.ओ.यु., अभिहस्तांतरण, न्यायालयीन काम आणि विधी विषयक सल्ला इत्यादी अनुभव असावा.<br>जे उमेदवार एम.आर.टी.पी. कायदा आणि भूसंपादन प्रकरणाविषयी विधी विषयक सल्ला देण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. | १ | १ |
| **लघु-टंकलेखक**<br>पी.बी.-I रु.५२००-२०२००<br>+ ग्रे.वे.रु.२४००/- | **शैक्षणिक अर्हता** : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा अथवा शासन मान्य समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक तसेच उमेदवाराजवळ ८० श.प्र.मि. वेगाचे लघुलेखनाचे व ४० श.प्र.मि. वेगाचे टंकलेखनाचे शासकीय प्रमाणपत्र असणे आवश्यक. | **अ.जा.- ३<br>अ.ज.- १<br>वि.जा.(अ) - १<br>भ.ज.(ब) - १<br>वि.मा.व. - १<br>इ.मा.व. - १<br>खुला - ६** | **१४** |

**'लघु-टंकलेखक' या संवर्गातील १४ रिक्त पदांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षण**

| अ. क्र. | समांतर आरक्षण → <br>सामाजिक आरक्षण ↓ | महिला (३०%) | माजी सैनिक (१५%) | अशंकालीन पदवीधर / पदविका (१०%) | सर्वसाधारण | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १ | - | - | २ | ३ |
| २ | अनुसूचित जमाती | - | - | - | १ | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | - | - | - | १ | १ |
| ४ | भटक्या जमाती (ब) | - | - | - | १ | १ |
| ५ | भटक्या जमाती (क) | - | - | - | - | - |
| ६ | भटक्या जमाती (ड) | - | - | - | - | - |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | - | - | - | १ | १ |
| ८ | इतर मागास वर्ग | - | - | - | १ | १ |
| ९ | खुला | २ | १ | १ | २ | ६ |
| | **एकूण** | **३** | **१** | **१** | **९** | **१४** |

## सर्वसाधारण अटी :-

१) उमेदवारांनी अर्ज https://mmrda.maharashtra.gov.in संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. हस्तदेय / टपालाव्दारे प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे **दिनांक २४/०८/२०१८** पर्यंतचीच वैध असतील. त्यानंतरची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

३) **वयोमर्यादा** : अ) मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे व खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे वयोमर्यादा राहील. (प्राधिकरणातील कर्मचारी यांना वयाचे बंधन नाही)
ब) माजी सैनिकांच्या बाबतीत संरक्षण दलातील ६ महिन्यापेक्षा जास्त सलग सेवा केली आहे अशा माजी सैनिकांचे वय वजा त्यांनी सशस्त्र दलात केलेली सेवा अधिक ३ वर्षे इतकी सवलत त्यांना देण्यात येईल.
क) अंशकालीन पदवीधर / पदविकाधारक यांना कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

४) शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दिनांक १०.१०.१९८० व दिनांक १६.४.१९८१ नुसार माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरीता पात्र उमेदवार असावा. तसेच शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.आरटीए-१०९०-२२-प्र.क्र.६-९३-१२, दिनांक ८.६.१९९३ मधील तरतूदीनुसार माजी सैनिक उमेदवाराने माजी सैनिक घटकाच्या आरक्षणाचा लाभ घेऊन शासकीय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर त्यास समांतर घटकाच्या लाभास पात्र राहणार नाही तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

५) माजी सैनिक या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांबाबत समांतर आरक्षणाच्या पृष्ठयर्थ सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा समांतर आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही. माजी सैनिकांची डिस्चार्जकार्डच्या प्रमाणित सत्यप्रती सादर करणे आवश्यक राहील. युध्दकाळात किंवा युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या, अपंगत्व येऊन नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला माजी सैनिक आरक्षणात नियुक्ती देण्याची तरतूद महाराष्ट्र शासन सा.प्र.वि.शासन निर्णय दिनांक २ सप्टेंबर, १९८३ मध्ये आहे. सदर तरतूदीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र अर्जदारांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा तसा दाखला संबंधित सैनिकाचा मृत्यू दाखला अथवा अपंगत्वाच्या कारणास्तव सेवेस अपात्र झाल्याचे प्रमाणपत्र तसेच सदर सैनिकांच्या कुटुंबातील आपण सदस्य असलेबद्दल तसेच यापूर्वी कुटुंबातील अन्य कोणीही माजी सैनिक आरक्षणाखाली लाभ घेतला नसल्याबद्दलचे कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेल्या प्रतिज्ञापत्राची सत्यप्रत जोडावी. (तथापि अशा नेमणूकीचा प्राधान्यक्रम युध्दकाळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे अपंग झालेल्या माजी सैनिकांच्या नंतर राहील) हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. अर्जदाराच्या हयात मुलांपैकी दिनांक २८ मार्च, २००६ नंतर तिसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपत्याचा जन्म झालेला नसावा. (अविवाहित अर्जदारानेसुध्दा सदरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

६) महाराष्ट्र शासनाच्या “सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य” या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक कर्मचाऱ्यांना १०% समांतर आरक्षण शासन निर्णयानुसार लागू राहील. अंशकालीन पदवीधर कर्मचारी या आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांची वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

७) खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणांतर्गत अर्ज केलेल्या महिला उमेदवारांनी शासन निर्णय क्र.८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/का.२, दिनांक २५ मे, २००१ नुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर उमेदवारास शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहील.

८) जाहिरातीमधील समांतर आरक्षणांतर्गत महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

९) समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६.३.१९९९ आणि सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०१२/१६/१२/१६-अ, दिनांक १३.८.२०१४ नुसार त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवार भरण्यात येईल.

१०) उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक (याबाबत माध्यमिक शालान्त परिक्षेचे प्रमाणपत्र सादर करावे.) अन्यथा त्यांना महाराष्ट्र शासन अधिसुचना क्र.मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दिनांक ३० डिसेंबर, १९८७ नुसार मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

११) शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च, २००५ अन्वये नियम ४ ‘अ’ अनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१२) निवड झालेल्या मागासवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत महाराष्ट्र शासनाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे. जर जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर ते नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची/तिची नेमणूक तात्काळ कोणत्याही पत्रव्यवहाराविना समाप्त करण्यात येईल.

१३) मागास प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिवास उमेदवारापुरतेच मर्यादित राहील. मागास प्रवर्गातील उमेदवारांनी महाराष्ट्रातील वास्तव्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विहित अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१४) इतर मागास प्रवर्ग आणि वि.जा./भ.ज. या प्रवर्गातील उमेदवारांनी समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबातचे दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

१५) सदर पदासाठी एमएस-सीआयटी अथवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तरापैकी कोणतीही एक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे हे अनिवार्य आहे. सदर अर्हता निश्चित केलेली असल्याने ते प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. विहीत प्रमाणपत्र नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहित प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. विहित मुदतीत संगणक हाताळणी/वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

१६) शासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयाचे **“ना हरकत प्रमाणपत्र”** सादर करणे अत्यावश्यक राहील.

१७) फक्त पूर्णवेळ कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल. अर्धवेळ मानधनावरील सेवा अनुभवात ग्राहय धरली जाणार नाही.

१८) ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालय) / समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहिल. अंशकालीन पदवीधर यांनी देखील ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहिल.

१९) निवड प्रकियेदरम्यान व तद्नंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य/अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड/नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

२०) सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या आरक्षणांच्या संख्येमध्ये बदल झाल्यास आरक्षित पदांमध्येही बदल होणार असल्यामुळे त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहील.

२१) परीक्षा शुल्क (नापरतावा) : खुला प्रवर्ग = रु.३००/- आणि राखीव प्रवर्ग = रु.१५०/- (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क लागू नाही.) परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगमार्फत करता येईल.

२२) पात्र उमेदवारांची प्राधिकरणामार्फत ‘सहायक विधी सल्लागार’ या पदाकरिता ८५ गुणांची बहुपर्यायी स्पर्धा परीक्षा व १५ गुणांची मुलाखत घेण्यात येईल. तसेच लघुटंकलेखक या पदाकरिता १२० गुणांची स्पर्धा परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. सदर परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व इतर प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल.

२३) परीक्षा प्रक्रिया, अभ्यासक्रम इत्यादीबाबत तपशील स्वतंत्रपणे प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२४) प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार रिक्त पदसंख्या विचारात घेता पात्र उमेदवारांची गुणांच्या आधारे निवडसूची बनविण्यात येईल.

२५) उपरोक्त पदांकरीता जर प्रतिक्षासूची तयार करण्यात आली तर त्यातील निवड झालेल्या उमेदवारांचा आवश्यकतेनुसार नेमणूकीकरीता विचार करण्यात येईल. तथापि, सदर प्रतिक्षासूची कोणत्याही परिस्थितीत एक वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता ग्राहय असणार नाही.

२६) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.

२७) जाहिरातीच्या अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे व ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी राखून ठेवलेले आहेत.

२८) विहित अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी, उपरोक्त अटींची पूर्तता होत आहे याची खातरजमा करुन त्यांचे वेब-आधारित ऑनलाईन अर्ज **दिनांक २४/०८/२०१८** पर्यंत https://mmrda.maharashtra.gov.in मार्फत Home page > Tender Notice & Vacancies > Recruitment अथवा Home page > Divisions > Administration > Recruitment मधून सादर करावेत.

**दिनांक : ०४ ऑगस्ट, २०१८**
**ठिकाण : मुंबई.**

**सही/-**
**अति.महानगर आयुक्त (१)**
**प्रकल्प संचालक (मुं.ना.प.प्रकल्प)**
**मुं.म.प्र.वि.प्रा.**

# MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

(A Govt. of Maharashtra Undertaking)
**M.M.R.D.A. Office New Building,**
**Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai – 400 051.**
**Website :** https://mmrda.maharashtra.gov.in **Tel.No. 022-2659 4197.**

**Advertisement for filling the posts of 'Assistant Legal Adviser'& 'Steno-Typist' on permanent basis as per social and horizontal reservation in Mumbai Metropolitan Region Development Authority**

| Name of the Post & Pay Scale. | Required Qualification, Experience & Age | | | No. of Post | Total |
|---|---|---|---|---|---|
| **Assistant Legal Adviser**<br>(PB-III Rs.15600-39100 + Grade Pay Rs.6600/-) | (i) **Qualifications** | : | The Candidate should be a Bachelor's Degree in Law or its equivalent from a recognized University under UGC; | 1 | 1 |
| | (ii) **Age** | : | 38 years for Open category and 43 years for reserved Category. (No age limit for MMRDA employees) | | |
| | (iii) **Experience** | : | Possess practical experience as advocate in the High Court or City Civil Court or Subordinate Court thereto for a period of not less than 7 years;<br>**OR**<br>Experience of working as responsible position in any of the offices of the State Government /Semi Government/Public Sector Undertakings/Corporations for not less than 7 years;<br>Candidate should have good experience of drafting, MoU's, conveyance, litigation work and legal advice etc;<br>Preference will be given to the candidate who possess experience in giving legal advice in MRTP Act and Land Acquisition matters; | | |
| **Steno-Typist**<br>PB.-I Rs.9300-34800 + G.P.Rs.4400/- | **Qualifications** | : | Should have possed the Secondary School Certificate examination or its equivalent. Candidate should possess a speed not less than 80 w.p.m. in Shorthand and 40 w.p.m.in typewriting. | S.C.- 3<br>S.T.-1<br>V.J.(A)- 1<br>N.T.(B)- 1<br>S.B.C.-1<br>O.B.C.-1<br>Open-6 | 14 |

**14 Vacant posts of Steno Typist as per social and horizontal reservation.**

| Sr. No. | Horizontal / Social Reservation | Women (30%) | Ex-Serviceman (15%) | Part time Degree / Diploma Holders Empolyee (10%) | General | Total Posts |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | S.C. | 1 | - | - | 2 | 3 |
| 2 | S.T. | - | - | - | 1 | 1 |
| 3 | V.J.(A) | - | - | - | 1 | 1 |
| 4 | N.T.(B) | - | - | - | 1 | 1 |
| 5 | N.T.(C) | - | - | - | - | - |
| 6 | N.T.(D) | - | - | - | - | - |
| 7 | SBC | - | - | - | 1 | 1 |
| 8 | OBC | - | - | - | 1 | 1 |
| 9 | Open | 1 | 1 | 1 | 2 | 6 |
| | Total | 3 | 1 | 1 | 9 | 14 |

## General Conditions :-

1) Candidates should submit their online applications through website https://mmrda.maharashtra.gov.in Applications received byhand / tapal will not be considered.

2) Age, Qualification, Expirence and Other certificates as **on 24/08/2018** will considered valid. Qualification acquired afterwards will not be considered.

3) Age Limit : 1) 43 years for reserve category and 38 years for Open Category.
(No age limit for MMRDA employees)
2) Ex-Serviceman who have put in not less than six months continuous service in the Armed Forcs are allowed to deduct from their age the length of continuous service in the Armed forces plus 3 years.
3) Age Limit upto 46 year for the part-time Degree/Diploma Holders Empolyee.

4) Applicant should be eligible as ex-servicemen for government service under GoM, GAD's Circulars dated 10.10.1980 & 16.04.1981. As per GAD's Government Order No.RTA-1090-22-CR.6-93-12 dated 08.06.1993, if ex-servicemen has taken benefit earlier of ex-servicemen scheme for government service, then he will not be treated eligible for a ailment of the said benefit except age relaxation.

5) Candidates belonging to Ex-servicemen horizontal reserved category should submit their certificate issued by the competent authority of the same horizontal reserved category. Otherwise, applicant will not held eligible for benefit of the said scheme. It is essential to submit certified copy of discharge card by the ex servicemen. Under GoM, GAD, Government Order dated 02nd September, 1983, there is a provision to give appointment under ex-servicemen category to only one person from the families who have martyr during the service or become handicapped during the war and not found fit to perform the duties. Those who wanted to take benefit under this scheme should produce a certificate from District Sainik Welfare Officer to the effect that concerned ex-servicemen death certificate or the applicant is belonging from the said ex-servicemen family those who is now handicapped and do not perform any duties. Further, applicant should submit a true copy of affidavit made before Executive Magistrate that I am the member and no one as yet from the ex servicemen family has taken the benefit of ex servicemen scheme (however, preference/priority will be given for appointment to these applicants after considering the candidature of ex servicemen who become handicapped during war period or service period). It is obligatory to submit affidavit of the family numbers live in prescribed format. Applicant's third or subsequent child should not born after 28th March, 2006 (It is obligatory to submit the certificate by unmarried applicant).

6) The degree/diploma holders those who have worked part time on remuneration for three years in Government offices under GoM's "Financal Assistance to Educated Unemployment Scheme" and made registration of their experiences in the "Employment Guidance Centre" are eligible for 10% reservation under Horizontal Reservation Scheme. The age limit of such part time degree/diploma holders are relaxed upto 46 years.

7) As per Govt. Resolution No.82/2001/म.से.आ/2000/प्र.क्र.4S15/का.2, दिनांक 25 मे, 2001 those who wants to apply under women reservation from open category are required to submit Non-Creamy Layer Certificate valid till 31st March, 2018. All the terms & conditions in the said G.R. dated 25-05-2001 are binding upon for the women candidates.

8) If women candidate is not found under the horizontal reserved category, then the same post will be filled from men candidate under the same category.

9) If the candidate is not available from the Horizontal reservation, the candidate will be filled in the same social category as per GAD Circular No.SRV-1097/C.R.31/98/16-A, dated 16.3.1999 and GAD Circular No.SRV-1012/16/12/16-A, dated 13.8.2014.

10) Candidate should have knoledge of Marathi language. (Candidate should submit S.S.C. Examination certificate.). Other wise they have to pass marathi examination as per Govt. of Maharashtra Circular No.SRV-2000/C.R.(17/2000)/12, dated 01st July, 2005.

11) As per Government Rule 4 "A" of the Government notification No.SRV-2000/CR(17/2000)/Twelve, dated 28thMarch, 2005 , the Candidate should produce/submit an affidavit of having a small family.

12) The Backward Class candidate should have Valid Caste Certificate issued by the Competent Authority of Govt. Of Maharashtra and should produce/submit the same. If the Caste Validity Certificate is not available, it is binding to submit the Caste Validity Certificate within six months from the date of appointment, failing which, his/her selection/appointment on the post will automatically come to end with immediate effect without any communication.

13) The reservation to Backward reserved Category is applicable only to the Backward Class candidates of Maharashtra State. The candidates are compulsorily required to produce/submit Domicile certificate of Maharashtra State without giving any reason.

14) Candidate applying for the N.T(C),N.T.(D) and Other Backward Class should produce/submit Non Creamy layer Certificate valid till 31st March, 2018 otherwise his/her application should not be considered under reserved category.

15) Candidates are required to pass one of the certificate examinations of MS-CIT or CCC or O-level or A-level or B-level or C- level which is compulsorily additional qualification for all posts. Accordingly,he/she should produce /submit a copy of the Certificate. If the candidate does not have such certificate, then he/she should pass the said Certificate Examination within two years from the date of appointment according to the GOM's GAD,GR.No. Training 2000/C.R.61/2001/39, dated 19th March, 2003, failing which his/her services would be terminated with immediate effect without any communication.

16) The candidate already employed in Govt. Sector, should compulsorily produce/ submit his/her 'No Objection Certificate from present employer.

17) The experience certificate of only full time work will be considered. The experience of part-time/honorarium service will not be considered.

18) Candidates who have registered their employment in the Employment and Self Employment Guidance Centers / Social Welfare Tribal Development Project Officers / Zilla Sainik Welfare Office will be required to apply online. Part-time graduates will also be required to submit online applications.

19) The selection of the candidate is liable to be terminated/cancelled at any point of stage if the copies of certificate submitted by the candidate at the time of interview/selection or thereafter are found to be invalid, suspicious and/or incomplete.

20) Number of Posts indicated in the advertisement may increase/decrease depending on our requirements.Accordingly reserved posts will be changed. Decision of the Competent Authority will be Final.

21) Exmination fee (non-refundable), For Open category = Rs.300/- and Reserved category = Rs.150/- (No fees for Ex-servicemen candidates). The payment can be made by using credit card / debit card or net banking.

22) Eligible candidate will have to undergo a competitive examination of multipurpose for 85 marks & 15 marks for interview for the post of Assistant Legal Adviser and competitive examination of multipurpose for 120 marks & 15 marks for professitional test for the post of Steno Typist. Shortlisted candidates will have to submit their Educational Documents.

23) The details of Exam and Syllabus will be published on MMRDA website, separately.

24) Candidates will be shortlisted on the merit of each candidate with reference to number of applications received to the number of posts vacant.

25) Waiting List prepared, if any, on the basis of Merit will be kept live for certain period depending on our requirement, however in any case, not beyond one year.

26) Recommendations and pressure for selection of candidates will not be entertained at any point of time. On the contrary, the said candidates who try to pressurize will be treated as ineligible for selection/appointment.

27) This Authority reserves its right either to cancel/postpone/modify the entire procedure in accordance with the advertisement or to cancel/postpone the advertisement, without any justification.

28) Candidates fulfilling above criteria shall fill up their Online application/s (Web-based) till dated **24/08/2018** through website https://mmrda.maharashtra.gov.in Home page > Tender Notice & Vacancies **OR** Home page **>** Divisions > Administration > Recruitment.

**Date : 4th August, 2018.**
**Place : Mumbai.**

**Sd/-**
**Addl. Metropolitan Commissioner (1)**
**Project Director (MUTP)**
**MMRDA**